International Journal of Advances in Engineering and Management (IJAEM)
Volume 2, Issue 7, pp: 651-656 www.ijaem.net ISSN: 2395-5252

# जागतिकीकरण आणि भारतीय कृषी क्षेत्राची वाटचाल

प्रा. डॉ. सिद्धार्थ मेश्राम, जे. एम. पटेल
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
कला, वाणिज्य वविज्ञान महाविद्यालय, भंडारा

Date of Submission: 25-09-2020 Date of Acceptance: 12-10-2020

सारांश :

शेतीला भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा म्हणतात. अजूनही ५५टक्के जनता शेती व्यवसायाशी निगडित आहे. म्हणून भारत शेतीप्रधान देश आहे असेही म्हटले जाते.भारतातील बहुसंख्य लोक खेड्यात वास्तव्य करतात. एकूण लोकसंख्येशी त्यांचे प्रमाण ६८ टक्केआहे. त्यांचा मुख्य व्यवसाय शेती आहे.शेती व शेती संलग्नित व्यवसाय त्यांच्या उपजीविकेचे प्रमुख साधन आहे.२०१२ ते १३मध्ये एकूण देशांतर्गत उत्पादनातील कृषी क्षेत्राचा वाटा १३.७टक्केपर्यंत कमी झालेला आहे. तरीही अर्थव्यवस्थेतील कृषी क्षेत्राचे वर्चस्व आजही कायम आहे. जागतिकीकरणाच्या २८वर्षानंतरच्या काळात सुद्धा शेती व त्या आधारित तत्सम व्यवसाययांच्या साहाय्याने ते आपली उपजीविका करतात. जुलै १९९१पासून जो आर्थिक सुधार कार्यक्रम अमलात आणला गेला त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था अधिक सक्षम होईल व त्याचे लाभ सर्व भारतीयांना मिळतील अशी आशा व्यक्त करण्यात येत होती. म्हणून आर्थिक सुधार कार्यक्रम अर्थव्यवस्थेतील उद्योग व्यापार व सेवा क्षेत्राबरोबरच वित्त क्षेत्रालाही लागू करण्यात आला होता. आज २८वर्षाच्या आर्थिक सुधारणा काळानंतर एकीकडे भारतातील आर्थिकवृद्धीदर, विदेशी विनिमय, माहिती व तंत्रज्ञान, निर्यात यात वांछनियसुधारणा होत आहेत. तर दुसरीकडे विकासाचे लाभ सर्व भारतीयांना समानतेने होताना दिसत नाहीत. आर्थिक व सामाजिक विषमते बरोबरच दारिद्र्य, बेकारी, शिक्षण, आरोग्याच्या अपुऱ्या सोयीसुविधा आणि शेती क्षेत्रात होणारी पिछेहाट इत्यादी समस्या भेडसावत आहेत. आर्थिक सुधार काळात औद्योगिक व सेवा क्षेत्राची प्रगती होत असताना कृषीक्षेत्र मात्र विकासापासून वंचित असल्याचे दिसते.

प्रस्तुत शोधनिबंधात आर्थिक सुधार कार्यक्रमाच्या काळात कृषी क्षेत्रावर कायइष्ट - अनिष्ट परिणाम घडून आलेत, सदयस्थिती आणि भविष्यातील आव्हाने काय ? याविषयीचा आढावा घेतला आहे.

बीज संज्ञा :

जागतिकीकरण, दारिद्र्य, बेकारी, प्रदुषण, ग्रामीण अर्थव्यवस्था.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत अध्ययन पूर्णपणे दुय्यम सामग्रीवर आधारित आहे. माहिती संकलन करताना क्रमिक पुस्तके, संदर्भ ग्रंथ, मासिके, नियतकालिके, इंटरनेट, प्रकाशित आणि अप्रकाशित साहित्य, वर्तमानपत्रे इत्यादीच्या आधारे माहिती संकलित केली आहे.

संशोधन प्रश्न:

१. औद्योगिकरणामुळे उद्योग क्षेत्राला अग्रक्रम मिळून शेती क्षेत्राची पिछेहाट होत आहे.
२. जागतिकीकरणामुळे शेती विकासाबरोबरच तत्समव्यवसायही डबघाईला येत आहेत.
३. जागतिकीकरणामुळे शेती क्षेत्राच्या विकासापुढे अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत.

प्रस्तावना :

भारतात ६ लाखापेक्षा जास्त खेडी आहेत.२०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येपैकी ६८ टक्के पेक्षा जास्त लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्य करीत आहे.

International Journal of Advances in Engineering and Management (IJAEM)
Volume 2, Issue 7, pp: 651-656 www.ijaem.net ISSN: 2395-5252

त्यांचा मुख्य व्यवसाय शेती व शेती संलग्नीत उद्योग हा आहे. ग्रामीण भागातील लोकांचा शेतीकडे पाहण्याचा दृष्टिकोण बराच संकुचित आहे. लहान व सीमांत शेतकरी आपल्या उपजीविकेचे साधन म्हणून शेतीकडे पाहतात. त्यामुळे शेतमालाची निर्यात करून इतर उद्योगाप्रमाणे धनप्राप्ती करणे हा त्यांचा उद्देश नसतो.भारतीय शेतीला मान्सूनचा जुगार म्हणतात. कारण शेतीला पाणीपुरवठा करणाऱ्या साधनांची बरीच कमतरता असल्यामुळे शेती उत्पादनाचे प्रमाणही कमी असते.ज्या वर्षात मान्सून अधिक असतो त्या वर्षी शेतमाल उत्पादन अधिक होते आणि ज्या वर्षी मान्सून चे प्रमाण कमी असते त्या वर्षीशेतमाल उत्पादन कमी असते. अर्थात भारतीयशेती संपूर्णतः पावसाच्यालहरीपणावर अवलंबून असते. भारतात मान्सूनचे प्रमाण अनिश्चित असते त्यामुळे शेतमाल उत्पादन पावसाच्या लहरीपणा नुसार बदलते आणि जे काही उत्पादन शेतकऱ्यांना मिळते त्यातून थोडे उत्पादन बाजारपेठेत विक्री करून उत्पादन खर्च व कौटुंबिक खर्च भागविण्याचा प्रयत्न केला जातो. ज्याप्रमाणे शेतमालाचे उत्पादन नैसर्गिक पावसाच्या लहरीपणावर अवलंबून असते त्याच प्रमाणे विक्री मालाच्या किमतीवरही अवलंबून असते. बाजारातील दलाल व अडते त्यांच्या शेतमालाची खरेदी करतात. व शेतमालाचा पूर्ण मोबदला शेतकऱ्यांना मिळत नाही.विपणन व्यवस्थेतही अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते.अडते व दलाल यांचे अस्तित्व, सदोषवजन व मापे, वाहतुकीच्या सोयींचा अभाव या सर्व समस्यांमुळे शेतकऱ्यांनी विकलेल्या मालापासून फारच थोडी रक्कम प्राप्त होते. स्वातंत्र्योत्तर काळात त्यात सुधारणा करण्याचा बराच प्रयत्न सरकारी पातळीवरून झाला असला तरी या समस्या आजही शेतकऱ्यांना भेडसावत आहेत. सद्यस्थित शेतमालासाठी हमीभाव निश्चिती, कृषी उत्पन्न बाजार समित्यांची स्थापना, सार्वजनिक वितरण व्यवस्थेद्वारे गरिबांना आवश्यक वस्तू वाटपाची व्यवस्था, कृषी खर्च मूल्य आयोगाची स्थापना इत्यादी शासकीय उपाययोजनांमुळे शेती विकासाला चालना मिळाली. अन्नधान्याच्या उत्पादनात बाबतीत देश स्वयंपूर्ण झाला. परंतु धान्य परवडणाऱ्या किमतीला गरिबा पर्यंत पोहोचविणे हे उद्दिष्ट साध्य होऊ शकले नाही.१९६१ ते१९८० या कालावधीत अमलात आणल्या गेलेल्या सुधारणांमुळे अन्नधान्य स्वयंपूर्णता साध्य होऊ शकली. याच कालावधीमध्ये अन्नधान्य उत्पादनाच्या बाबतीत हरित क्रांती घडवून आली.

नियोजन काळात शेती विषयक धोरणांची उपेक्षा :

१९५१ते १९६१या काळातअमलात आलेल्या पंचवार्षिक योजनाउद्योगप्रधान होत्या. उद्योगांना केंद्रस्थानी ठेवून विकासात्मक धोरणाला प्राधान्य देण्यात आले. जवळ-जवळ पहिल्या तीन पंचवार्षिक योजनांमध्ये उद्योग अग्रस्थानी असल्यामुळे कृषीक्षेत्राकडे फारसे लक्ष देण्यात आले नाही. कृषीच्या विकासाला प्रथम स्थान देऊन कृषी सुधारणांची मुहूर्तमेठरोवणे महत्वाचे होते. परंतु तसे घडले नाही. त्यामुळे ते कृषी विसंगत ठरले व कृषीक्षेत्र ‘ जैसे थे ’ या स्थितीत राहिले. परिणामतः १९६० च्या दशकात अन्नधान्याचा तुटवडा जाणवू लागला. यास्तव१९६१ ते१९८० या दोन दशकात अन्नधान्य उत्पादनातील स्वयंपूर्णता गाठणे हे नियोजनाचे मुख्य उद्दिष्ट ठरविले गेले. शेतीचे नवीन तंत्रज्ञान व अधिक उत्पादन देणारे संशोधित बियाणे असा कार्यक्रम आखून शेती सुधारणेकडे लक्ष पुरविले गेले. परंतु ते पहिल्या तीन पंचवार्षिक योजनेतच व्हायला पाहिजे होते.जरी आग शेतीचा विकास होऊन भारताला अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्णता गाठता आली.तरी धान्य उत्पादनाबरोबरच तेलबिया आणि डाळींचे उत्पादन वाढविण्यासाठी तंत्रज्ञान मोहीम हा कार्यक्रम १९८६ पासून सुरू करण्यात आला. या उत्पादनात मात्र लक्षणीय वाढ घडून येऊ शकली नाही.१९९७ ते २००४ या काळात शेतीतील भांडवली गुंतवणूक कमी झाली त्यामुळे पाठ बंधारे,ग्रामीण विद्युतीकरण, ग्रामीण रस्ते, बाजारपेठ इत्यादी पायाभूत सुविधा विकासाला फटका बसला.१९९० च्या दशकात कृषी क्षेत्राच्या वाढी वरविपरीत परिणाम झाला.१९८० या दशकात कृषी क्षेत्रातीलस्थूल राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर ३.५ टक्के होता. तो १९९० च्या दशकात ३.१टक्के पर्यंत कमी झाला.

International Journal of Advances in Engineering and Management (IJAEM)
Volume 2, Issue 7, pp: 651-656 www.ijaem.net ISSN: 2395-5252

जागतिकीकरण व कृषीची पिछेहाट :

जागतिकीकरणाच्या काळात औद्योगिक विकासावर अधिक लक्ष पुरविण्यात आल्यामुळे कृषी क्षेत्रातील गुंतवणूक कमी करण्यात आली.१९८१ – ८२ मध्ये ७१३० कोटी रुपये असलेली गुंतवणूक १९९० ते ९१ मध्ये ४९०२ कोटी रुपये इतकी कमी झाली आणि २००० - ०१ मध्ये ती पुन्हा कमी होऊन ४५२० कोटीपर्यंत घटली. यावरून जागतिकीकरणामुळे कृषी विकास अवरोधित झाला असे दिसून येते. शेतीच्या निर्यातीवर अनिष्ट परिणामच निदर्शनास येत असलेले दिसते. त्याप्रमाणे कृषीच्या वृद्धी दरातील वाढतही प्रतिकूल परिणाम झाल्याचे दिसते.१९८१ते १९९१ मध्ये असलेला कृषी व संबंधित क्षेत्राचा वृद्धी दर ३.८ टक्के होता.१९९१ ते २००१ या दहा वर्षाच्या कालावधी तो २.३टक्के झाला आणि २००१ ते २००७ या कालावधीत त्यात पुन्हा घट होऊन केवळ २.२टक्के राहिला. कृषी क्षेत्रातील सार्वजनिक गुंतवणुकीचा वाटाही घटलेला आहे.१९९० मध्ये सार्वजनिक गुंतवणूक ३० टक्के होती. ती२००८ ते २००९ मध्ये १८.५टक्के झाली. त्याचप्रमाणे जागतिकीकरणामध्ये लघु व कुटीर उद्योगांचे अस्तित्व धोक्यात आल्याचे दिसते. त्यामुळे कृषीच्या अविकसित पणाला जागतिकीकरणच जबाबदार आहे असे म्हणता येईल.

जागतिकीकरणाचे शेती व ग्रामीण विकासावरील परिणाम :

बहूराष्ट्रीय निगमांनी विकसनशील देशांच्या ग्रामीण भागत१९७० ला हरित क्रांतीच्या नावाखाली प्रवेश केला. खते, संशोधित बियाणे, पीक संरक्षणाचे उपाय यासारख्या
बाबतीत बराच स्वावलंबी असलेला शेतकरी या कंपन्यांच्या आधीन झाला. रासायनिक खते, सुधारित बियाणे, विवध कीटकनाशके यांचा वेगाने प्रसार होत असताना शेतकऱ्यांचे परावलंबित्व वाढत गेले.

जागतिकीकरणामुळे शेती व ग्रामीण विकासावर होत असलेले अनिष्ट परिणाम पुढील प्रमाणे दिसून येतात :

१. शेतीच्या उत्पादनात उत्पादन खर्चात वाढ:

हरित क्रांतीमुळे शेतीच्या उत्पादनाचे तंत्र वेगाने बदलत आहे. शेतीचे उत्पादन वाढावे म्हणून सिंचन,सुधारित व संशोधित बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके, आधुनिक अवजारे यामुळे उत्पादन खर्चात मोठी वाढ झाली आहे. या सर्व बाबींचा वापर वाढला असल्यामुळे शेतकऱ्यांना खते, बियाणे, कीटकनाशके यात वेगवेगळे बदल करून शेतकऱ्याला लुटण्याचा प्रयत्न होत आहे. भारतात छोटे व सीमांत शेतकरी मोठ्या प्रमाणात आहेत. त्यांचे धारणक्षेत्र छोटे असल्यामुळे सुधारित पद्धतीने शेती करणे न परवडणारे झाले आहे.

२. शेतजमिनीचा इतर उपयोगासाठी वापर :

शेतकऱ्यांना अल्प मोबदला देऊन शेती इतर पर्यायी उपयोगासाठी वापरली जात आहे. जागतिकीकरणामुळे मोठमोठ्या बहूराष्ट्रीय कंपन्या शेती क्षेत्रात प्रवेश करीत आहेत.शेतीला शासकीय पाठबळ असल्यामुळे हजारोएकर जमिनी या कंपन्यांनी हडपल्या आहेत.

३. डब्लूटीओचे जाचक नियम :

जागतिक व्यापाराची सर्व सूत्रे आता विकसित देशांच्या हातात एकवटले आहे. जागतील व्यापार संघटनेने शेती विकासासाठी अनुदानाबाबत जे नियम आखले आहेत ते प्रत्यक्षात विकसित देशच डावलत आहे. अमेरिकेने याबाबत म्हटलेले विधान स्पष्ट करते की जागतिक व्यापार संघटनेच्या कराराचे काहीही झाले तरी चालेल पण आमच्या शेतीची अनुदाने कमी केली जाणार नाही. यामुळे जागतिकीकरणाने विकसनशील देशांतील निर्यातीच्या संधी वाढल्या आहे, हे म्हणणे विसंगत ठरते. या उलट डब्लूटीओच्या माध्यमातूनच विकसित देश स्वताच्या देशांचा फायदा साध्य करीत आहेत.

४. बौद्धिक संपदा अधिकार :

बौद्धिक संपदा अधिकार मोठ्या कंपन्यांच्या हातात जाऊन त्यांना विकसनशील देशातील शेतकऱ्यांच्या शोषणाचा नवीन मार्गच उपलब्ध झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा बियाणे साठवण्याचा व विनिमय करण्याचा हक्कहिरावला गेला आहे.

परिणामत:शेतकऱ्याला परावलंबीत्व, कर्जबाजारीपणा व अखेर आत्महत्या या संकटात आणून सोडले आहे.

५. दारिद्र्यात वाढ :

जागतिकीकरण म्हणजे विकसनशील देशाचा जलद विकास ही गोष्ट फक्त महानगरातील श्रीमंत वर्ग बद्दलच लागू होते. ग्रामीण भागातील बहूसंख्य सामान्य जनतेला जागतिकीकरणाने कोणताही फायदा झाला नाही. ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व जमाती यांच्या दारिद्र्याचे प्रमाण किंचितही कमी झालेले नाही.२००० मध्ये अनुसूचित जातीतील ३६ टक्के तर अनुसूचित जमातीतील ४४ टक्के लोक दारिद्र्यरेषेखाली होते. या वर्गाचा कोणता फायदा झाला हा प्रश्न अजूनही अनुत्त्तरीतच आहे.

६. ग्रामीण शिक्षणावरील परिणाम:

जागतिकीकरणामुळे उत्पादन व उद्योग क्षेत्राबरोबरच शिक्षण क्षेत्रात सुद्धा स्पर्धा निर्माण झाली आहे. नवीन व्यावसायिक शाळा, महाविद्यालय, नवीन अभ्यासक्रम इत्यादी संस्था निर्माण झाल्या आहेत. त्याच्या महागड्याशुल्कामुळे क्षमता नसतानासुद्धा ग्रामीण भागातील विद्यार्थी त्याला बळी पडत आहे. गावातील जि. प. शाळा बंद पडत आहेत. आणि एवढा खर्च करूनही शहरी भागातील विद्यार्थ्यांशी स्पर्धा करण्यात ते मागे पडत आहेत.

७. काही इतर ठळक परिणाम :

१. जागतीकरणामुळे विकसित राष्ट्रातील चंगळवादाचे भारतातहीआगमन झाले आहे.
२. चैनीच्या वस्तूची मागणी वाढली आहे.
३. बहूराष्ट्रीय कंपन्याच्या प्रवेशामुळे ग्रामीण लघु व कुटीर उद्योगांवर स्पर्धेत
ठिकण्याचेकठीण दिवस आले आहेत.
४. विदेशातील प्रदूषण भारतात पोहोचले आहे.
५. बहूराष्ट्रीय कंपन्यां द्वारे ग्रामीण समाजाची पिळवणूक होत आहे.

भारतीय कृषी पुढील आव्हाने :

योजना काळतील शेती विकास योजनांमुळे ग्रामीण भागाच्या विकासाला काही प्रमाणात गती मिळाली. शेतकरी, शेतमजूर, कारागिर इत्यादींना सरकारच्या विशिष्ट गटासाठीचे कार्यक्रम (SFAL) आणि विशिष्ट भागासाठी च्या कार्यक्रमामुळेरोजगार संधी उपलब्ध झाल्या. काही प्रमाणात आर्थिक दुर्बलता कमी होण्यास मदत झाली.

परंतु ग्रामीण विकासामध्ये शेतीचा विकास अभिप्रेत आहे. सध्या भारताचे कृषी क्षेत्र आणि शेतकरी अनेक बाबतीत अडचणीत आहेत. जागतिकीकरणानंतर भारतीय शेतीपुढे अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. त्यात प्रामुख्याने नैसर्गिक आपत्तीमुळेपिकांचे होणारे नुकसान (अवकाळी पाऊस, दुष्काळ, भूकंप, गारपीट इ.) शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा व आत्महत्या, शेती क्षेत्रातीलघटती सार्वजनिक गुंतवणूक,शेतमजुरांचाप्रश्न, विजेच्या भारनियमनाचा प्रश्न, विक्रीव्यवस्थेतील उणिवा, जमीन अधिग्रहणाचे प्रश्न इत्यादीचा समावेश होतो. यामुळे अल्पभूधारक व सीमांत शेतकऱ्यांसाठी शेती व्यवसाय मुळीच किफायतशीर ठरत नाही. म्हणून भारतीय शेती क्षेत्राच्या विकासाकरिता पुढील आव्हानांचा व उपायांचा विचार करावयास पाहिजे.

१.ग्रामीण मजुरांचे व कौशल्य विकासीत करून शेतीतील छुपी बेकारी कमी करण्याची गरज आहे.
२.गेल्या दशकात कृषी विकास धोरणात कृषी बाजार सुधारणा आणि पायाभूत सुविधांचा विचार झालेला नाही. कृषिमाल विक्रीसाठी नवीन तंत्रज्ञान आणि ग्रामीण पायाभूत सुविधांचा विस्तार जसे :- वीज, पाणी, रस्ते, वाहतूक इत्यादींमध्ये गुंतवणूक वाढवून कृषी क्षेत्रात रोजगार संधीचे मोठ्या प्रमाणात निर्मिती होऊ शकते आणि ग्रामीण लोकसंख्येचे शहरांकडे होणारे स्थलांतर कमी करता येऊ शकते.

३.ग्रामीण भागातील सुशिक्षित तरुण रोजगाराच्या निमित्ताने शहरांकडे धाव घेऊ लागतात. त्यामुळे शहरीकरण वाढून शहरीकरणामुळे उद्भवणाऱ्या समस्यात भर पडते. स्थलांतरांच्या समस्यांना रोखण्यासाठीग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करणे आवश्यक आहे.त्यामुळे ग्रामीण तरुणांना स्थानीय

रोजगार मिळून बेरोजगारी व गरीबी इत्यादींच्या समस्यांचे निराकरण शक्य होईल.
४.शेतीच्या शाश्वत विकासापासून ग्रामीण विकास साध्य करण्यासाठी व्यापक उपाययोजनांची काटेकोर अंमलबजावणी आवश्यक आहे. त्यासाठी कोरडवाहू शेती तंत्र विकसित करणे, गावांच्या भौगोलिक अभ्यासातून पिकांचा आकृतीबंध निश्चित करणे, जलसमृद्धीतून शेतीचा विकास करणे, विविध उपायांच्या माध्यमातून ग्राम समृद्धीकडे वाटचाल करणे इत्यादी सुक्ष्म पातळीवरील योजना राबविण्यासाठी विवध प्रयान करण्याची गरज आहे.

५.कृषीला पूरक व्यवसायांना पाठबळ दिल्यास ग्रामीण विकासाला मदत होईल. ग्रामीण विकासाबाबत केवळ शासनच नव्हे तर स्वयंसेवी संघटना, सामाजिक संस्था, युवक, महिला इत्यादींचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा ठरेल. त्यासाठी पोषक वातावरण निर्माण करावयास शासन सहभागही महत्त्वाचा असेल.

६.शेती सुधारणा प्रभावीरीत्या पार पाडण्यासाठी सामुदायिक विकास योजनेत शिक्षणाला महत्त्वाचे स्थान आहे. शिक्षण हे सर्वांगीन विकासाला सफल करण्याचे प्रभावी माध्यम आहे. शिक्षणामुळे व्यक्तीचा आर्थिक,सामाजिक, बौद्धिक विकास होतो.म्हणून ग्रामीण बालकांसाठी शिक्षणाच्या सोयींचा विस्तार करणे, प्रौढ शिक्षणाचा कार्यक्रम राबविणे, स्त्री शिक्षणात वाढ करून व्यवसाय प्रशिक्षण देणे,शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे शिक्षण देणे, इत्यादी कार्यक्रम विकसित करणे महत्त्वाचे ठरते.

७.शेतीचा विकास करण्यासाठी पाणीपुरवठ्याच्या सोयीनिर्माण करणे, कोरडवाहू जमीन पाण्याखाली आणणे, उच्च दर्जाचे संकरित बियाणे वापरणे,कीटकनाशके, खते व कृषी योग्य आदाने यांची व्यवस्था करणे महत्त्वाचे ठरेल. या सर्व आदानांच्या वापरासाठी वित्तपुरवठा महत्त्वाचा असल्यामुळे शेतकऱ्यांना कमी व्याजदरावर कर्जाचा पुरवठा करणे यासाठी शासनव्यवस्थेची तत्पर सेवा महत्वाची असते. शेतकऱ्यांच्या निव्वळ लाभासाठी विपणन व्यवस्थेत आमुलाग्र बदल व सुधारणा करणे अगत्याचे आहे.
८.ग्रामीण भागातील बहुसंख्य जनता निराशावादी व आत्मविश्वासू नसलेली असल्यामुळे ही जनता व्यापार, उद्योग व व्यवसायाकडे वळत नाही. म्हणून शासकीय स्तरावर काही उद्योग, प्रकल्प सुरु करण्यात यावेत. सर्व मोठमोठे उद्योग, प्रकल्प शहरी भागातच उभारले जातात. यामुळे शहरीकरणात वाढ होऊन खेडी ओसाड पडत आहेत. ग्रामीण जनतेचे शहराकडे स्थानांतर वाढत आहे. असे उद्योग व प्रकल्प तालुका पातळीवर स्थापन केल्यास ग्रामीण रोजगारीत वाढ होऊन बेरोजगारी व दारिद्र्याचा प्रश्न मिटण्यास मदत होईल. व प्रादेशिक असमतोल कमी होण्यास ही मदत होईल.

समारोप :

जागतिकीकरणामुळे भारताचे औद्योगिकीकरणात बरीच मजल मारली असे दिसत असले तरी एकूण लोकसंख्येपैकी एका मोठ्या वर्गावर त्या प्रगतीचथेंबही पडला नाही. विकासाचा झरा तळागाळाच्या वर्गापर्यंत जो फार मोठा आहे तोपर्यंत झिरपलाच नाही. आपल्या विकासाच्या वाटचालीतील ही मोठीन्यूनता आहे. देशाच्या सर्वांगीन विकासाकरिता या सर्व बाबी मोठी बाधा निर्माण करणाऱ्या आहेत. आज एकूण लोकसंख्येच्या ६८टक्के ग्रामीण लोकसंख्येचा विकास म्हणजे खेड्यांचा विकास होणार नाही तोपर्यंत भारताचा विकास होणे शक्य नाही.

जागतिकीकरणामुळे शहरीकरणात वेगाने वाढ होत आहे. शहराच्या विस्तारामुळे अनेक समस्या उदयास आल्या आहेत. जागेची टंचाई, झोपडपट्टीची समस्या, प्रशासन विषयक समस्या, सार्वजनिक सोयींचा अभाव, ई-कचऱ्याची समस्या, प्रदूषणाची समस्या इत्यादी समस्यांमुळे महानगरातील प्रशासनाची तारांबळ उडत आहे. या सर्व समस्या सोडविण्यासाठी उद्योगधंद्यांचे विकेंद्रीकरण करणे, शेतीच्या विकासावर अग्रक्रमाने लक्ष पुरविणे, ग्रामीण रोजगारीतसातत्यक्षम वाढ करणे हे उपाय योजल्याशिवाय दारिद्र्य, भूक व असंतोष यावर मात करता येणार नाही. हे सरकारी पातळीवरील एक नाही तर अनेक आव्हाने आहेत.

यास्तव सरकारने औद्योगिक विकास, सेवाक्षेत्राचा विकास व त्यासोबतच शेती क्षेत्राचा विकास व ओधाने ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाकडे तातडीने लक्ष पुरविण्याची ची गरज आहे. यातच भारताचा सर्वांगीण विकास अवलंबून आहे.

<u>संदर्भसूची</u>

१.भागवत ॲडमिरल विवणु : ' जागतिकीकरण नवीन गुलामगिरी ' समता प्रकाशन,समतासैनिक दल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर उड्डाणपूल लष्करीबाग, नागपूर – ४४००१६.

२.दत्त गौरव, महाजन अश्विनी : ' भारतीय अर्थव्यवस्था ' एस. चन्द एण्ड कंपनी प्रा. लि.७३३९ रामनगर,नई दिल्ली– ११००५५.

३.कराडे जगन : ' जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने ' डायमंडपब्लिकेशन,१६९१, सदाशिव पेठ, शंकरप्रसाद
कौ. हौ. सो., टिळक रोड, पुणे – ४११०३०.

४.कराळे गंगाधर : ' ग्रामीण विकास के लिये समन्वित प्रयास,नीतीया,कार्यक्रम एवं रणनीती,कॉन्सेप्ट पब्लिशिंग कंपनी,नई दिल्ली– ११००५९

५.खेर सी. पं. :' दारिद्र्याची संकल्पना आणि निवारण,दिलीपराजप्रकाशन प्रा. लि.२५१ शनिवार पेठ, पुणे – ३०

६.नक्वी सय्यद नवाब हैदर : ' विकासाचे अर्थशास्त्र ' सर्वसमावेशकवृध्दीच्या दिशेने,
SAGE publication indiaPvt. Ltd.B1/1 – T Mohan Co-operative Industrial Area, Mathura Road , New Delhi 110044, India.

७.निकम अविनाश रामलाल : ' अर्थसंवाद ' एप्रिल – जून २०१४, खंड ३८अंक १, मातृपितृ कृपा, प्लॉट नं. ३२,परिमल कॉलनी, शहादा– ४२५४०९ नंदुरबार

८.निकम अविनाश रामलाल : ' अर्थसंवाद ' जानेवारी – मार्च २०१३, खंड ३६अंक ४, मातृपितृ कृपा, प्लॉट नं. ३२,परिमल कॉलनी, शहादा– ४२५४०९ नंदुरबार

९.निकम अविनाश रामलाल: ' अर्थसंवाद ' एप्रिल – जून २०१५, खंड ३९अंक १, मातृपितृ कृपा, प्लॉट नं. ३२,परिमल कॉलनी, शहादा– ४२५४०९ नंदुरबार

१०.म्होपरेराहुल: ' अर्थसंवाद ' विद्यापीठक्वर्टर नं.डी – ३४,सायबरसमोर, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर४१६००४

११.सिंह कटार, शिशोदियाअनिल: ' ग्रामीण विकास ' तत्वे, धोरणे आणि व्यवस्थापन, चौथीआवृत्ती.
SAGE publication indiaPvt. Ltd.B1/1 – T
Mohan Co-operative Industrial Area,
Mathura Road ,post bag 7
New Delhi 110044, India.

१२.शर्मा ओ. पी. :' भारत में नियोजित विकास और आर्थिक उदारीकरण ' आरबीएसए पब्लिशर्स, एसएम एस हइवे, जयपुर– ३०२००३ राजस्थान.